
सुधाकर तळवडेकर
भेटीत तृष्टता मोठी
ई साहित्य प्रतिष्ठान
www.esahity.com
esahity@gmail.com

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# भेटीत तृष्टता मोठी

(व्यक्तीचित्रे)

लेखक : सुधाकर अशोक तळवडेकर

# भेटीत तृष्टता मोठी

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

### हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

### असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

### दाम नाही मागत. मागत आहे दाद.
### साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

भेटीत तृष्टता मोठी (व्यक्तीचित्रे)

लेखक :   सुधाकर अशोक तळवडेकर

मोबाईल आणि whatsapp नं. : 8108819800

ई मेल : sudhakartalawadekar8108819800@gmail.com

फेसबूक : https://www.facebook.com/sudhakar.talawadekar

पत्ता : ६,निशिला निवास, ८,जयप्रकाश नगर, रोड नं.२, गोरेगांव (पू), मुंबई ४०००६३

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखककाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.  तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957.  Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : ३१ मे २०१९

©esahity Pratishthan®2019

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# भेटीत तृष्टता मोठी

सुधाकर अशोक तळवडेकर

# काही बोलायाचे आहे.......



आपण माझ्या ‘अबोल हा पारिजात आहे’ या पहिल्या कथेला उदंड प्रतिसाद दिलात त्याबद्दल मी सर्वप्रथम आपले मनापासून आभार मानतो. आपल्या प्रेमामुळेच मी माझा लेखनाचा वारसा पुढे चालू ठेवत आहे. आपल्याला आपल्या दैनंदिन आयुष्यात अनेक प्रकारची माणसे भेटतात. भेटतात पेक्षा ‘दिसतात’ म्हणणे जास्त बरोबर होईल. कारण आपल्या धावपळीच्या जीवनात त्यांना ‘भेटायला’ आपल्याकडे वेळच नसतो. पूर्वीच्या काळी चवली (म्हणजे दोन आणे) आणि पावली (म्हणजे चार आणे) अशी नाणी असत. अशा चवल्यापावल्या एकत्र करून लाखमोलाचा रुपया तयार व्हायचा. आजच्या लाखोंच्या व्यवहारी जगात मात्र त्या रुपयाचे मोल कुठेतरी हरवले आहे. मला भेटलेल्या इतरांच्या दृष्टीने चवल्या-पावल्या सारख्या (किरकोळ) माणसांनी माझ्या आयुष्यात मात्र मला तो लाखमोलाचा रुपया देऊ केला. तसेच प्रत्येक नाण्याला दोन बाजू असतात आणि त्या दोन्ही आपल्याला बघायला, तसेच समजूनही घ्यायला हव्यात, हे या लोकांनी मला शिकविले. केवळ कथेच्या सोयीसाठी काल्पनिक नावांचा आणि ठिकाणांचा वापर केला आहे. आपला अभिप्राय मला खालील माध्यमांतून जरूर कळवा.

सुधाकर अशोक तळवडेकर

मोबाईल आणि whatsapp नं. : 8108819800

ई मेल : sudhakartalawadekar8108819800@gmail.com

फेसबुक : https://www.facebook.com/sudhakar.talawadekar

पत्ता : ६,निशिला निवास, ८,जयप्रकाश नगर, रोड नं.२, गोरेगांव (पू), मुंबई ४०००६३

श्री. सुधाकर तळवडेकर यांचे ई साहित्यतर्फ़े प्रकाशित कथासंग्रह

अबोल हा पारिजात आहे

खालील लिंकवर उपलब्ध आहे.

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/ahpa_sudhakar_talawadekar.pdf



## **अर्पणपत्रिका**

माझे हे पुस्तक

माझ्या ज्ञात आणि अज्ञात

अशा सर्व रसिकांना समर्पित.

अनुक्रमणिका


1. आदित्य
2. गायत्री
3. गिरकर आजोबा
4. मोहिते काका
5. राणी काकू

# आदित्य

दिनांक :- १८.०६.२०१६

आज सकाळी नेहेमीप्रमाणे स्टेशनवर गेलो. जोरदार पाऊस पडत होता. लोकल नेहेमीपेक्षा जरा जास्त उशिराने चालत होत्या. मी प्लॅटफॉर्म नं.2 वर गाडीची वाट बघत उभा होतो. इतक्यात प्लॅटफॉर्म नं.1 वरून काही रेल्वे कर्मचारी स्ट्रेचर घेऊन जाताना दिसले. सोबत एक पोलिसपण होता. प्लॅटफॉर्मवरची माणसे बोलत होती, ‘लटकत जात होता आणि खाली पडून मेला.’ सगळेजण त्याला त्याच्या चुकीबद्दल शिव्या देत होते. मला मात्र त्या मुलापेक्षा त्याच्या आई-वडिलांबद्दल वाईट वाटत होते. जगातले कोणतेही आई-वडील वाट्टेल ते दु:ख सहन करू शकतात पण एक दु:ख सहन नाही करू शकत, “बाप के कंधे पे बेटे का जनाजा.” इतक्यात माझी लोकल आली. उशीर झाल्यामुळे गर्दीपण जास्तच होती. मी कसाबसा शेवटी चढलो, पण मी पूर्णपणे दरवाज्याच्या आत होतो.

लोकल चालू झाली. एवढ्यात एक २०-२१ वर्षाचा मुलगा जिन्यावरून धावत-धावत आला आणि माझ्यामागे दरवाज्याला लटकत उभा राहिला. मला प्रथम त्या मुलाचा राग आला. ‘एक लोकल चुकली तर कोणते एवढे आभाळ कोसळणार आहे?’ असे मला वाटले. तो मुलगा ज्या खांबाला लटकून उभा होता तो खांब पावसाच्या पाण्याने ओला झाला होता. मला वाटले त्याचा हात सटकू शकतो. मी त्याला माझ्या खांद्याला पकडायला संगितले. मग तो मुलगा एका हाताने माझ्या खांद्याला विळखा घालून व एक हात दरवाज्याच्या दांड्याला पकडून दरवाज्याच्या कडेवर कसाबसा उभा राहिला.

जोगेश्वरीला थोडी गर्दी कमी झाली आणि तो आत येऊन उभा राहिला. त्याने मदत केल्याबद्दल माझे आभार मानले. त्याचे नाव आदित्य होते. त्याचे वडील अंधेरीच्या एका हॉस्पिटलमध्ये अ‍ॅडमिट होते. त्यांना हृदयविकारचा झटका आला होता. त्याची आई निवृत्त शिक्षिका होती. तिच्या पेन्शनवर आदित्यचे घर चालले होते. आदित्यला हल्लीच एक नोकरी मिळाली होती. पण तो प्रोबेशनरी काळ होता. त्याला कंपनीच्या कामासाठी एक महिना सुरतला

जावे लागले होते. प्रोबेशनरी काळ असल्यामुळे त्याला सुट्टी घेऊन वडिलांना भेटण्यासाठी यायला जमत नव्हते. त्याचे वडील सतत त्याची आठवण काढत होते. आज सकाळीच तो परत आला होता आणि त्याला वडिलांना भेटून कामावर जायचे होते. कारण जर आज त्याने सुट्टी घेतली असती तर त्याची नोकरी गेली असती आणि वडिलांना भेटला नाही तर त्यांच्या जीवाचे काहीतरी बरे वाईट होईल आणि तो धक्का त्याची आई पचवू शकणार नाही, असे डॉक्टरांचे म्हणणे होते. म्हणून त्याला ही गाडी पकडणे खूप गरजेचे होते. त्याची कथा ऐकून माझ्या मनातला त्याच्यावरचा राग कमी झाला आणि त्याच्याबद्दल सहानुभूती वाटू लागली.

माझे लक्ष त्याच्या अवताराकडे गेले. दोन दिवस दाढी न केलेला चेहेरा, काखेत उसवलेला शर्ट, बूट कमीतकमी पाच वर्षापूर्वीचे असतील, बॅगेला दहा ठिकाणी ठिगळं चिटकवलेली होती. त्यात त्याला वडिलांची औषधे घ्यायची होती. आम्ही लोकलमधून उतरलो. आम्हाला एकच बस पकडायची होती. बसमध्ये चढल्यावर त्याने त्याचा Nokia चा जुना फोन काढला आणि कोणालातरी फोन लावू लागला. मग त्याने मला विचारले, ‘मी तुझा मोबाइल वापरू शकतो का? माझा Balance संपला आहे. जरा डॉक्टरांना फोन करायचा होता.’ मी त्याला माझा फोन दिला. त्याने त्याच्या डॉक्टरांना फोन लावला आणि वडिलांच्या तब्बेतीची चौकशी करू लागला. मी फूल ना फुलाची पाकळी म्हणून त्याच्या नकळत रविवारी मित्रांसोबत Movie बघायला जाण्यासाठी साठवलेले ५०० रु. ची नोट त्याच्या बॅगेत टाकली. याचे कारण म्हणजे एकतर त्याने माझ्याकडून पैसे घेतले नसते आणि दुसरे म्हणजे बॅगेत पैसे सापडल्यावर ते आपलेच आहेत चुकून बॅगेत राहिले असे त्याला वाटेल. त्याचा स्टॉप आला. त्याने माझा फोन परत दिला आणि जाता-जाता मला म्हणाला, “आज तू तीन लोकांचे प्राण वाचवलेस.” मलाही एका गरजवंताला मदत केल्याचे समाधान मिळाले आणि ऑफिसला जाऊन स्वत:ला कामात बुडवून घेतले.

संध्याकाळी माझ्या मोबाइल वर एक मेसेज आला. माझ्या नंबर वर कोणीतरी ५०० रु. चा रिचार्ज मारला होता. मला काहीच कळेना. मग काही वेळाने मला एक दुसरा मेसेज आला,

“प्रिय सुधाकर,

मी तुझा नवा मित्र आदित्य.

तुझा नंबर मला डॉक्टरांच्या मोबाइल मधून मिळाला. माझ्या वडिलांची प्रकृती आता सुधारते आहे. माझी नोकरी पण आज पक्की झाली आहे, आणि मी नेहेमी घरातून निघताना माझी बॅग तपासतो बरं का. अरे मला खरचं पैशाची गरज नव्हती. माझ्या आईने माझ्या नकळत एक R.D. अकाऊंट उघडला होता त्याची मुदत आज संपली आहे. जपून ठेव हे पैसे. एखाद्या दुसऱ्या आदित्यसाठी कामी येतील........”

तो मेसेज पाहून मला हायसे वाटले. पण राहून-राहून एकच प्रश्न सतावत होता की, सकाळी अपघातात मेलेला सुद्धा कोणीतरी ‘आदित्य’ तर नसेल ना?........

------****------

# गायत्री

दिनांक :- १८.१२.२०१६

गेल्या शुक्रवारी ऑफिसच्या कामानिमित्त अंधेरीला गेलो होतो. दोन दिवस सुट्टी असल्यामुळे कितीही उशीर झाला तरीही काम संपवणे जरुरीचे होते. रात्री १०.३० वाजता परत यायला निघालो. रविवारी मामाकडे जायचे होते. त्याच्या लहान मुलांसाठी –सुनीता- आणि –सुरेश- साठी मला आई-बाबांनी काहीतरी आणायला संगितले होते. सुनीतासाठी फ्रॉक आणि सुरेश साठी चड्डी व टी-शर्ट आणि थोडासा खाऊ घेऊन मी अंधेरीला लोकल ट्रेन पकडली. उशीर झाल्यामुळे गर्दी कमी होती. जोगेश्वरी स्टेशनवर गाडीत एक जवळपास १०-१२ वर्षांची मुलगी एका ५-६ वर्षांच्या मुलाला घेऊन चढली. त्यांच्या मळक्या आणि फाटक्या कपड्यांवरून दोघेही भिकारी आहेत हे समजले. मुलगी हातातल्या दगडाच्या पट्ट्या वाजवत “दुनिया बनाने वाले” हे गाणे गाऊ लागली. एवढ्या गर्दीत आणि गोंगाटात, कोणतेही Musical Instrument नसतानही तिचा आवाज ‘सा रे ग म प’ च्या महाविज्येत्यापेक्षा दसपट सुमधुर होता. ती डब्याच्या एका टोकाला उभे राहून गाणे म्हणत होती आणि तिच्याबरोबरचा तो लहान मुलगा दुसऱ्या टोकाला भीक मागत होता. तो मुलगा माझ्या बाकाजवळ आला तेव्हा एका माणसाने त्याला तुसडेपणाने ‘हाड’ असे म्हटले. तो मुलगा कोमेजलेला चेहेरा घेऊन पुढे निघून गेला. मला त्या माणसाचा राग आला. एक रुपया देण्याची दानत किंवा इच्छा नसेल तर फक्त ‘नाही’ म्हणण्याऐवजी समोरच्याचा अपमान करण्यात या लोकांना कोणते सुख मिळते कोणास ठाऊक?

लोकल गोरेगांवला आली. मी उतरलो आणि ती लहान मुलगी त्या छोट्या मुलाला घेऊन उतरली आणि जिन्याच्या पायऱ्या चढू लागली. सहज म्हणून मी तिचा गुपचुप पाठलाग करू लागलो. ती चालत चालत हायवेवर आली. जोरदार पावसाने किंवा जोरदार वाऱ्याने कधीही कोलमडून पडेल अशा एका झोपडीवजा घरात जाऊन ती बसली. ते तिचे घर होते कदाचित. मी शेजारच्या बस स्टॉप वर बसून राहिलो. तिच्या घरातील बोलण्याच्या आवाजांवरून त्या मुलीचे नाव गायत्री आहे असे मला समजले. गायत्रीचा बाप झोपडीबाहेर उताणा पडला होता. त्याच्या डोक्याजवळ रिकामी दारूची बाटली होती. गायत्रीची गरोदर आई गायत्रीच्या त्या छोट्या भावाला खिचडी भरवत होती. गायत्रीने भीक मागून जमवलेले पैसे आईकडे दिले आणि आईने

केलेली खिचडी ताटात घेऊन बाहेर आली. तेवढ्यात समोरच्या लग्नाच्या हॉल मधून काही कर्मचारी बाहेर आले आणि दोन ड्रम भरून उरलेले अन्न समोरच्या कचऱ्याच्या ढीगाऱ्यात टाकून निघून गेले. गायत्री आशाळभूत नजरेने त्या कचऱ्यातील अन्नाकडे पाहत ती 'रोजची खिचडी' खात होती. खिचडी संपल्यावर तिने ताट धुतले आणि महानगरपालिकेच्या दिव्याखाली कोणतेतरी पुस्तक घेऊन बसली. तोवर तिच्या घरातले सगळेजण झोपले होते.

मी तिला हाक मारली. ती माझ्याकडे आली. मी तिच्या हातातले पुस्तक बघितले. ते एक चित्रांचे पुस्तक होते. मी सुनीता आणि सुरेश साठी घेतलेले कपडे आणि खाऊ तिला दिला. तसेच थोडेसे पैसेही दिले. प्रथम ती नको म्हणत होती पण मी आग्रह केल्यावर मात्र तिने ते घेतले आणि मला विचारले, "याच्यासाठी मी तुम्हाला काय देऊ?' मी म्हणालो, "एखादे गाणे म्हणून दाखव मला. आत्ता." ती एकदम खुश झाली आणि तिने "झिंदगी एक सफर है सुहाना" हे गाणे गायला सुरवात केली. रात्री बाराच्या सुमाराला, त्या सामसुम रस्त्यावर त्या नऊ-दहा वर्षाच्या मुलीच्या तोंडून जीवनाचे सार संगणारे ते गाणे ऐकताना माझे भान हरपले. मी अगदी एकाग्रतेने ते गाणे ऐकू लागलो. गाणे संपले आणि गायत्री झोपण्यासाठी निघून गेली. मी पण घरी आलो आणि 'ऊशीर झाल्यामुळे दुकाने बंद झाली म्हणून सुनिता आणि सुरेशसाठी काही आणता आले नाही' असे आई-बाबांना सांगितले. त्यांच्यासाठी आपण कधीही आणि कितीही भेटवस्तू घेऊ शकतो, पण गायत्री सारख्या मुलीला आनंदाचे दोन क्षण देण्याची संधी आपल्या आयुष्यात कधीतरीच येते. सुखी माणसाला अजून सुखी करण्यापेक्षा दु:खी माणसाला थोडेसे सुख देणे कधीही चांगले असते. माझ्या भेटींमुळे गायत्री किती खुश झाली असेल याचा विचार करत मी झोपी गेलो.

आज मामाकडून परत येताना दादर स्टेशनला गायत्रीला पहिले. योगायोगाने ती तिच्या छोट्या भावाला घेऊन माझ्याच डब्यात चढली. ती नेहेमीप्रमाणे गाऊ लागली आणि तिचा भाऊ भीक मागू लागला. पण मी मात्र तिला बघून चाटच पडलो. तिने मी दिलेला फ्रॉक घातला होता आणि तिच्या भावाने पण मी दिलेले चड्डी आणि टी-शर्ट घातले होते. पण त्यांचे नवीन कपडे पाच वर्ष जुने वाटावेत इतके मळलेले होते. काही ठिकाणी थोडे-थोडे मुद्दामहून फाडलेले आणि उसवलेले पण होते. तिची आणि माझी नजरा-नजर झाली. तिच्या डोळयात मला अपराधीपणाची भावना स्पष्टपणे दिसत होती. कारण एखाद्या दिवशी कितीही चांगले कपडे

किंवा कितीही चांगले खायला मिळाले, तरीही अशी भिकाऱ्यांची वेशभूषा केल्याशिवाय तिच्या घरात ती ‘रोजची खिचडी’ बनणार नव्हती.

मी तिच्याकडे पाहून स्मितहास्य केले. तीदेखील हसली. मी तिची परिस्थिती समजून घेऊन तिला माफ केल्याने तिला झालेला आनंद मला तिच्या डोळयात स्पष्टपणे दिसत होता. पुढच्या स्टेशनवर ती तिच्या छोट्या भावाला घेऊन उतरली. मी खिडकीतून तिच्या आणि तिच्या छोट्या भावाच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहत राहिलो. ती गेली, पण जाता-जाता लहानपणी ऐकलेल्या ‘सुख पाहता जवापाडे, दु:ख पर्वताएवढे’ या अभंगाचा अर्थ पूर्णपणे समजावून गेली...........

-------*****------

# गिरकर आजोबा

दिनांक : २२.०७.२०१७

काल दादरला एका मित्राकडे गेलो होतो. काम संपल्यावर परत येण्यासाठी बसस्टॉपवर येऊन उभा राहिलो. एवढ्यात तेथे सफेद लेंगा-पैरण, डोक्यावर गांधी टोपी, काखेत झोळी आणि पायात कोल्हापुरी चपला अशा अवतारातील जवळपास ७० वर्षाचे आजोबा काठीचा आधार घेत आले. त्यांनी मला एक कागद दाखवला. तो त्याच भागातील एक पत्ता होता. मला त्या भागाची फारशी माहिती नव्हती. मी त्या मित्राला फोन करून पत्ता विचारला. त्या ठिकाणी जाण्यासाठी बसने जावे लागणार होते. मी त्या आजोबांना बसचा नंबर आणि कसे जायचे ते सांगितले. पण त्यांच्या चेहेऱ्यावरून ते गोंधळलेले वाटत होते. कदाचित प्रथमच मुंबईत आले असावेत. ते रस्ता चुकतील या भितीने मी त्यांना म्हणालो, “या आजोबा, मी सोडतो तुम्हाला.” माझ्या या वाक्याने त्यांच्या चेहेऱ्यावरचे चिंतेचे भाव जाऊन आनंद दिसू लागला.

बस आली. मी त्यांना घेऊन बसमध्ये चढलो. तिकिटे काढली आणि त्यांच्याशी गप्पा मारू लागलो. त्यांचे नाव सदानंद गिरकर होते. ते गावी –नाशिकला- राहत असत, आज त्यांच्या मुलाचा –प्राणितचा- वाढदिवस होता. त्यामुळे ते प्राणितसाठी गावावरून त्याच्या आवडीचे लाडू घेऊन आले होते. त्यांना प्राणितला आश्चर्याचा धक्का द्यायचा होता म्हणून त्यांनी प्राणितला त्यांच्या येण्याबद्दल काहीच संगितले नव्हते. त्यांचे एक मित्र त्यांना घ्यायला एस.टी. स्टँडवर येणार होते. पण कदाचित त्यांची चुकामुक झाली आणि गिरकर आजोबांकडे मोबाईल आणि त्यांच्या मित्राचा नंबर नसल्यामुळे त्यांची पंचाईत झाली. त्यातच त्यांना आज संध्याकाळच्या गाडीने परत गावी जायचे होते.  म्हणून ते स्वत:च प्राणितचा पत्ता शोधत निघाले. त्यांना घरी फोन करून आपण सुखरूप पोहोचलो असे सांगायचे होते. मी त्यांना माझ्या मोबाईलवरुन त्यांच्या घरी फोन लावून दिला. पण बिझी मिळत होता. आमचा स्टॉप आला म्हणून त्यांनी फोन लावायचा मोह सोडला.

मी आजोबांना सावकाश उतरवले आणि प्राणितच्या बिल्डिंगमध्ये गेलो. प्राणितच्या घरासमोर गेलो तर त्याच्या दरवाज्याला कुलूप लावलेले होते. मी शेजाऱ्यांकडे चौकशी केली तर

ते म्हणाले, “काल मला म्हणत होता की आज कोणत्यातरी कामासाठी बाहेरगावी जाणार आहे. पण कोणते काम आणि कुठे जाणार हे मात्र सांगितले नाही.” त्यांचे उत्तर ऐकून गिरकर आजोबांचा मुलाला भेटण्यासाठी आनंदी झालेला चेहेरा एकदम पडला. ते परत गावी जायचे म्हणू लागले. मलापण वाईट वाटले, पण काही इलाज नव्हता. एकतर शेजाऱ्यांकडे प्राणितचा नंबरपण नव्हता. तो कुठे गेला आहे आणि कधी परत येईल याचीपण खात्री नव्हती. त्यामुळे आजोबांचे म्हणणे मला बरोबर वाटू लागले. आम्ही परत बस स्टॉपकडे जायला निघालो.

चालता चालता आजोबांना अचानक चक्कर आली. जवळजवळ ते माझ्या अंगावर कोसळलेच. मी त्यांना कसेबसे पकडून फूटपाथवर बसवले. मला काय करावे सुचेचना. तेथूनच जाणाऱ्या एका टॅक्सीला मी त्याला हात दाखवून थांबवले आणि आजोबांना जवळच्या कोणत्यातरी हॉस्पिटलमध्ये न्यायची विनंती त्या टॅक्सी ड्रायव्हरला केली. त्यानेपण प्रसंगाचे गांभीर्य ओळखून त्वरित आजोबांना टॅक्सीत घातले आणि जवळच्या ‘शरयू हॉस्पिटल’ मध्ये नेले. योगायोगाने तेथे मला डॉक्टर देशमुख भेटले. ते माझ्या मित्राचे बाबा होते. मी त्यांना सर्व घटना थोडक्यात समजावून सांगितली. त्यांनीपण आजोबांना ताबडतोब अॅडमिट करून घेतले आणि त्यांच्यावर उपचार चालू केले. मी त्या टॅक्सीवल्याचे आभार मानले आणि टॅक्सीचे भाडे देऊन त्याला मोकळे केले. डॉक्टर देशमुख बाहेर आले आणि म्हणाले, “आजोबांना हार्ट-अटॅक आला आहे. आमचे मोठे डॉक्टर – डॉ. पत्की – काही कामानिमित्त बाहेर गेले आहेत. ते आत्ता येतीलच. मग आम्ही आजोबांना ऑपरेशन थिएटरमध्ये हलवू. तू त्यांच्या घरी फोन करून त्यांना आजोबांच्या अवस्थेबद्दल सांग.” मी माझ्या मोबाईलच्या ‘डायल लिस्ट’ मधून आजोबांच्या घरचा नंबरवर फोन केला. पलीकडून आवाज आला, “हॅलो, दीर्घायुषी वृद्धाश्रम.”

मी क्षणभर सुन्नच झालो. मी ताबडतोब फोन कट केला. मला वाटले कदाचित चुकीचा नंबर डायल झाला असावा. मी परत संपूर्ण डायल लिस्ट शोधली पण आजोबांनी त्याच नंबरवर फोन केला होता हे नक्की. मी परत त्या नंबरवर फोन केला तर पलीकडून आवाज आला, “हॅलो, दीर्घायुषी वृद्धाश्रम.” मी हिम्मत करून गिरकर आजोबांविषयी चौकशी केली. तर पलीकडचा माणूस म्हणाला, “अहो गिरकर आजोबा कालपासून बेपत्ता आहेत, आम्ही पोलिस स्टेशनमध्ये तक्रारसुद्धा नोंदवली आहे. आज सकाळी त्यांचा मुलगा प्राणितही येऊन गेला. तुम्ही कोण?” मी त्यांना प्राणितचा मित्र आहे असे सांगून त्यांच्याकडून प्राणितचा मोबाईल नंबर घेतला. प्राणितला

फोन करून झाला प्रकार त्याला समजावून सांगितलं आणि त्याला हॉस्पिटलचा पत्ता सांगितला आणि लवकर येण्यास सांगितले. अचानक त्याचा फोन कट झाला. पुन्हा प्रयत्न केला तर त्याचा फोन स्विचऑफ मिळत होता. एवढ्यात तेथे डॉक्टर पत्की आले. त्यांनी आजोबांना बघितले आणि डॉक्टर देशमुखांना लगेचच आजोबांना ऑपरेशन थिएटरमध्ये हलविण्यास संगितले. मग ते माझ्याकडे आले आणि मला सांगितले, “त्यांना इकडे आणल्याबद्दल धन्यवाद. तुला वेळ असेल तर जरा तासभर थांबशील का? मला तुझ्याशी जरा बोलायचे आहे.” ऑफिसला सुट्टी असल्यामुळे मी हो म्हणालो. डॉक्टर पत्की ऑपरेशन थेटर मध्ये गेले. मी तेथेच एका बाकड्यावर बसून राहिलो. जवळपास तासाभराने ऑपरेशन थिएटरचा लाल दिवा बंद झाला आणि डॉक्टर पत्की बाहेर आले. त्यांनी मला त्यांच्या केबिन मध्ये बोलावले आणि मला गिरकर आजोबांची जी कथा सांगितली ती ऐकून मी हादरलोच.

प्राणित हा गिरकर आजोबांचा एकुलता एक मुलगा. गिरकर आजोबा, प्राणित आणि त्याची आई -नारायणी- हे नाशिकला त्यांच्या गावी राहत होते. वयाच्या विसाव्या वर्षी प्राणित मुंबईला नोकरीसाठी आला. कामात अतिशय हुशार असल्याने त्याचा कंपनीने त्याला चांगला पगार आणि मुंबईत राहला घर दिले. शहरी जीवन आणि मल्टीनॅशनल कंपनीत मोठ्या पदाची नोकरी, यामुळे प्राणितला आपल्या ‘मागासलेल्या’ आई-वडिलांची लाज वाटू लागली. त्याने त्यांच्याशी संबधच तोडले. शहरातील एका श्रीमंत मुलीशी लग्न केले आणि येथेच आपल्याच मस्तीत जीवन जगू लागला. मध्यंतरी त्याची आई कॅन्सरच्या आजाराने वारली तर तिच्या अंत्यविधीसाठी देखील हा गावी गेला नाही. कारण त्याचे दिल्लीला एक खूप मोठे डील फायनल होत होते. आई वारल्यावर त्याने वडिलांशी भांडून गावचे घर आणि जमीन विकली. कारण त्याला मुंबईमध्ये स्वत:चा व्यवसाय सुरू करायचा होता. म्हणून त्याने त्याच्या वडिलांना वृद्धाश्रमात ठेवले. गिरकर आजोबा आता थकत चालले होते. आपल्या सख्ख्या मुलाला एकदा वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्याची त्यांची शेवटची इच्छा होती. म्हणूनच ते वृद्धाश्रमातून पळाले आणि मुंबईमधल्या त्यांच्या मित्राला –डॉ.पत्कीला- त्यांनी फोन केला आणि “आपल्याला मुंबईत भेट” असे सांगितले. पण दुर्दैवाने त्यांची भेट चुकली होती.

डॉक्टर पत्की यांनी मी गिरकर आजोबांना वेळेवर दवाखान्यात आणल्याबद्दल माझे आभार मानले आणि गिरकर आजोबांना आता कोणताही धोका नाही असे संगितले. मी डॉक्टरांना प्रणीतचा नंबर दिला आणि प्राणितला फोन केल्याचे संगितले. मी परत जायला निघालो. जाताना

एकदा गिरकर आजोबांना भेटण्याची इच्छा झाली. डॉक्टरांची परवानगी घेऊन मी I.C.U. मध्ये गेलो, तर गिरकर आजोबा शांतपणे झोपले होते. त्यांना उठवणे माझ्या जिवावर आले. आयुष्यात परत त्यांची भेट होईल की नाही हे सांगणे अवघड होते. मी परत एकदा त्यांना डोळेभरून पहिले आणि त्यांच्यासाठी देवाकडे प्रार्थना करून हॉस्पिटलच्या बाहेर पडलो....

आज माझा वाढदिवस. सकाळपासून मला शुभेच्या देणाऱ्यांचे फोन SMS येत होते. घरी सगळेजण पार्टीची तयारी करत होते. मी मात्र मनातून जरासा उदास होतो. आपण आपला वाढदिवस दरवर्षी धुमधडाक्यात साजरा करतो, पण गिरकर आजोबांसारखी मुलाच्या मायेला पारखी झालेली माणसे आपल्या पोटाच्या पोरला भेटून वाढदिवसाच्या शुभेच्छादेखील देऊ शकत नाहीत, याचेच मला वाईट वाटत होते. मनात सतत वाटत होते की गिरकर आजोबांना भेटून यावे. नेमका तेव्हाच मला प्राणितचा फोन आला. मी ताबडतोब घरातून बाहेर आलो आणि तो उचलला. प्राणित फोनवर सारखा रडत होता. कसेबसे स्वत:ला शांत करून तो माझ्याशी बोलू लागला. त्याच्या बोलण्यावरून माझ्या मनातले सर्व प्रश्न दूर झाले.

काल तो नाशिकला गेला होता. वृद्धाश्रमातून गिरकर आजोबांना घरी परत आणण्यासाठी. गेल्या वर्षी त्याला त्याच्या व्यवसायात मोठा तोटा झाला होता आणि तो भरून काढण्यासाठी त्याला त्याची सगळी संपत्ती विकावी लागली. गरीब झाल्यामुळे त्याच्या बायकोने त्याला घटस्फोट दिला व आपल्या मुलाला घेऊन ती तिच्या श्रीमंत वडिलांकडे परत निघून गेली. आता प्राणितला आपल्या आई-वडिलांची किंमत कळू लागली. आपल्या रक्ताच्या नात्यापेक्षा जगात काहीच मोठे नसते हे त्याला पुरते कळून चुकले आणि आता आपल्या वडिलांना आपल्यासोबत घेऊन राहण्याचा निर्णय त्याने घेतला. पण जर काल मी त्याच्या वडिलांना भेटलो नसतो तर त्याची आणि त्यांची शेवटची भेट पण झाली नसती असे त्याचे म्हणणे होते. शेवटी तो मला म्हणाला, “आज तुम्ही मला आणि माझ्या वडिलांना जीवनदान दिलेत. मला तुम्हाला एकदा भेटून तुमचे आभार मानायचे आहेत. तुमचे नाव काळू शकेल का?” मी म्हणालो, “मी एक सामान्य माणूस आहे.” आणि मी फोन कट केला. कारण एका हाताने केलेली मदत दुसऱ्या हाताला कळू देऊ नये असे म्हणतात.

आज जर मला कोणी विचारले, “तुला वाढदिवसाला काय पाहिजे?” तर मी त्यांना सांगेन, “आयुष्यात जर कधी माझ्यावर गिरकर आजोबा होण्याची वेळ आलीच, तर मलापण एखादा ‘सामान्य माणूस’ भेटू दे, अशी देवाकडे प्रार्थना करा.”

--------******--------

# मोहिते काका

दिनांक : २३.११.२०१७

गेल्या रविवारी मित्रांसोबत ‘गेटवे ऑफ इंडिया’ला जायचा प्लॅन केला होता. गोरेगांववरुन चर्चगेट फास्ट लोकल पकडली. बांद्रा स्टेशनला गाडीत एक सामान्य कपड्यातले, जवळपास ५० वर्षांचे फेरीवाले काका हातात भली मोठी बॅग घेऊन चढले. लहान मुलांसाठी फोल्डींगचे चष्मे विकत होते. अगदी सराईत विक्रेत्यासारखे एकदम हसऱ्या, प्रसन्न चेहेऱ्याने आणि नकलाकारासारखे अभिनय करत ते चष्मे दाखवू लागले. २० रूपयांचे चष्मे बऱ्याच लोकांनी पहाण्यासाठी मागितले. काही लोकांनी ते चष्मे विकत घेतले तर काही लोकांनी परत केले. मला माझ्या छोट्या भावासाठी तो चष्मा घ्यावासा वाटला. मीपण बघण्यासाठी मागितला. मला एक चष्मा  देऊन ते दुसऱ्या टोकाला गेले. मी तो चष्मा बरोबर आहे का ते तपासून पाहू लागलो. तो अगदी चांगल्या अवस्थेत होता. विकत घ्यावा यासाठी ते परत येण्याची वाट बघू लागलो. समोर पाहिले तर ते फोनवर कोणाशीतरी बोलत होते आणि अचानक दादर स्टेशनला उतरले. गाडीत गर्दी असल्याने मला उठून जाता आले नाही. मी त्यांना हाका मारण्याचा प्रयत्न केला पण ते उतरले आणि निघून गेले. माझे मित्र म्हणाले, “जाऊ दे रे. २० रूपयांचा तर चष्मा आहे. एका गेला तर काही कळणार पण नाही त्याला. दे सोडून.” मलापण हे पटले. यात माझी तर काही चूक नव्हती आणि २० रुपयांनी त्यांना काही फार मोठा फरक पडणार नव्हता. तसेच ही गोष्ट त्यांच्या लक्षात पण आली नसणार. मी घरी परत आल्यावर तो चष्मा माझा १० वर्षाच्या छोट्या भावाला देऊन टाकला. त्याचा चेहेरा अगदी आनंदी झाला. पण माझ्या मनात कुठेतरी अपराधिपणाची भावना होती. आपण नकळत का होईना, त्या काकांना फसवले आहे असे मला वाटत होते.

काही दिवसांनंतर ऑफिसमधून परत येताना एका मेडिकलमध्ये ALL OUT विकत घ्यायला थांबलो. अचानक मेडिकल मध्ये तेच फेरीवाले काका आले. त्यांना पाहून मी जरा घाबरलोच. यांनी मला ओळखले तर? पण ते माझ्याकडे पाहूनही काही बोलले नाहीत यावरून त्यांनी मला ओळखले नाही हे मला समजले आणि मी निश्चिंत झालो. त्यांनी एका

डॉक्टरांचे Prescription त्या मेडीकलवाल्याला दिले. त्या Prescription वर नाव ‘संजय मोहिते’ असे लिहिले होते. त्या मेडीकलवाल्याने सगळी औषधे आणली आणि किंमत सांगितली, “१,१६० रुपये.” मोहिते काकांनी पैसे काढले. ५०० रुपयाची एक नोट, १०० रुपयांच्या तीन नोटा, ५० रुपयांची एक नोट, १० रुपयांच्या काही नोटा आणि बरीचशी नाणी होती. त्यावरून त्यांची परिस्थिति गरिबीची आहे हे मला समजले. ते सगळे पैसे मोजताना त्या मेडीकलवाल्याचा चेहेरा अगदी त्रस्त झालेला होता. माझी ऑर्डर आली आणि मी पैसे दिले. तोपर्यंत त्या मेडीकलवाल्याचे पैसे मोजून झाले होते. त्यात २० रुपये कमी पडत होते. मोहिते काकांकडे अजून पैसे नव्हते. त्यांचा चेहेरा दु:खी झाला. त्यातच तो मेडिकलवाला घाई करू लागला. मी त्याला २० रुपये दिले आणि दोघांना मोकळे केले. मोहिते काकांच्या डोळ्यात पाणी आले. त्यांनी हात जोडून माझे आभार मानले. मला त्यांचे तसे वागणे पाहून जास्तच अपराधी वाटू लागले. खरंतर मी त्यांच्यावर कोणताही उपकार केले नव्हते. मी पण काही बोललो नाही निदान माझ्या मनातील अपराधीपणाची भावना निघून जाईल असे मला वाटले. ते औषधे घेऊन निघून गेले. मी सहज म्हणून त्या मेडीकलवाल्याला विचारले, “कोणत्या आजाराची औषधे होती हो?” मेडिकलवाला म्हणाला, “अस्थम्याची.”

मला प्रश्न पडला की कोणासाठी असतील ही औषधे? कारण मोहिते काका तर चांगले धडधाकट दिसत होते. मी सहज म्हणून त्यांचा पाठलाग केला. ते जवळच्या ‘जाणिवा’ हॉस्पिटलमध्ये गेले. मी पण त्यांच्या मागून गेलो. तिथे त्यांचा एक मित्र आणि डॉक्टर काहीतरी बोलत होते. मोहिते काकांनी डॉक्टरांना ती औषधे दिली. डॉक्टरांनी औषधे नर्सला देऊन मोहिते काकांना आपल्यासोबत यायला सांगितले. ते गेल्यावर मी त्यांच्या मित्राजवळ गेलो आणि त्यांना सगळी गोष्ट समवजून सांगितली. त्यांनीदेखील माझे आभार मानले आणि तेही माझ्याशी मनमोकळेपणाने बोलू लागले. ते मोहिते काकांचे शेजारी होते. मोहिते काकांच्या 10 वर्षाच्या मुलाला अस्थम्याचा अटॅक आला होता. त्याला I.C.U. मध्ये ठेवले होते.

मोहिते काका लहानपणापासूनच गरीब होते. जवळच्याच झोपडपट्टीत राहत होते. लहानपणीच त्यांचे आई-वडील वारले. त्यामुळे त्यांना शिक्षण अर्धवट सोडावे लागले. तेव्हापासूनच ते लोकलमध्ये अशा वस्तू विकून आपले पोट भरू लागले. त्याच वेळी त्यांची बायकांच्या डब्यात वस्तू विकणाऱ्या मुलीसोबत मैत्री झाली आणि त्यांनी त्या मुलीसोबत लग्न

केले. त्यांना वाटले आता आपल्या घरी सुखाचे दिवस येतील. त्यांची बायको गरोदर असतांनादेखील लोकलमध्ये वस्तु विकायची. पण 2006 साली लोकलमध्ये झालेल्या बॉम्बस्फोटात तिचा मृत्यू झाला. मोहिते काका त्यांची बायको आणि मुलाला एका क्षणात गमावून बसले. त्यांना खूप वाईट वाटले. एका रात्री त्यांना लोकल मधे एक 5 वर्षाचा मुलगा सापडला. त्याच्या आई-वडिलांनी त्याला वाऱ्यावर टाकून दिले असावे कदाचित. मोहिते काकांनी देवाने आपल्याला देणगी दिली असे समजून त्या मुलाला उचलले आणि आपल्यासोबत घेऊन आले. त्यांनी त्या मुलाचा पोटच्या मुलाप्रमाणे सांभाळ केला. त्याचे नाव संजय ठेवले.

एके दिवशी संजय आजारी पडला. तेव्हा मोहिते काकांनी त्याला डॉक्टरांकडे नेले. तेव्हा त्यांना समजले संजयला अस्थाम्याचा आजार आहे. ऑपरेशन करावे लागेल आणि त्याचा खर्च खूप जास्त आहे. आपल्या मुलाच्या भविष्यासाठी मोहिते काकांनी दिवसरात्र मेहेनत करायला सुरवात केली. दिवसभर लोकलमध्ये वस्तु विकायचे आणि रात्री भुर्जीपावच्या गाडीवर काम करायचे. यात त्यांना त्यांच्या शेजारच्यांनी खूप मदत केली. ते दिवसभर संजयचा सांभाळ करायचे. गेल्या रविवारी संजयला फारच त्रास होऊ लागला. त्यामुळे शेजाऱ्यांनी त्याला हॉस्पिटल मध्ये अ‍ॅडमिट करून मोहिते काकांना फोन लावला. म्हणून ते त्यादिवशी घाईघाईने लोकलमधून उतरले होते.

मला त्यांची कहाणी ऐकून गलबलून आले. मी डॉक्टरांच्या केबिन बाहेरून त्यांना पहिले. लोकलमधला त्यांचा प्रसन्न चेहेरा मुलाच्या जीवाच्या काळजीपोटी चिंताग्रस्त झालेला दिसत होता. स्वत:ची सगळी दु:खे पोटात घालून हसऱ्या चेहेऱ्याने लोकांसमोर जाताना त्यांच्या मनाची काय अवस्था होत असेल याची मी कल्पनाही करू शकत नव्हतो. माझ्या दहा वर्षांच्या भावाच्या चेहेऱ्यावर आनंद आणणाऱ्या मोहिते काकांना स्वत:च्या मुलाच्या चेहेऱ्यावर तसा आनंद पाहता येईल का? असा प्रश्न मला पडला. लोकलमध्ये हे फेरीवाले लोक म्हणत असतात दुकानात १०० रुपयांना मिळणारी वस्तु फक्त २० रुपयाला. आपण त्यामध्ये फक्त Quality चा विचार करतो. पण त्या वस्तु विकणाऱ्याच्या भावना आपल्याला कळत नाहीत. त्यांच्यासाठी ती एक वस्तु विकली जाणे देखील लाखमोलाचे असते.

मी हॉस्पिटलमधून बाहेर पडलो. शेजारच्या चहाच्या टपरीवरील Radio वर किशोर कुमारचे ‘जिंदगी एक सफर है सुहाना’ हे गाणे लागले होते. बऱ्याच दिवसांनंतर आवडीचे गाणे ऐकायला मिळाले म्हणून तेथे थांबून ऐकू लागलो. तेवढ्यात मागून हाक ऐकू आली,

“साहेब.” मी दुर्लक्ष केले. मला वाटले कोणीतरी कोणालातरी हाक मारली असेल. पण ती हाक माझ्यासाठीच होती. मोहिते काका धावत आले आणि मला म्हणाले, “धन्यवाद साहेब.” आणि माझ्या हातात २० रुपयांची नोट ठेवली आणि धावतच परत हॉस्पिटलमध्ये गेले. मला काही बोलायची संधीच दिली नाही.

ते गेले आणि मी हताशपणे त्या २० रूपयाच्या नोटीकडे पाहत राहिलो. त्यावरचा गांधीजींचा हसरा चेहेरा पाहून लोकल मधला मोहितेककांचा हसरा चेहेरा माझ्या डोळयांसमोर आला. Radio वर गाणे चालू होते, “मुसकुराते हुए दिन बिताना, यहा कल क्या हो किसने जाना..................”

----------******------------

# राणी काकू

दिनांक : २०.०५.२०१८

गेल्या रविवारची गोष्ट. घरी एकटाच होतो. सुट्टी असल्याने दुपारी झोपलो होतो. एवढ्यात दारावरची बेल वाजली. झोपमोड झाली म्हणून जरा वैतागूनच दार उघडले. दारात जवळपास ४५-५० वर्षांच्या, साधासा पंजाबी ड्रेस, डोळयांना जाड भिंगाचा चस्मा, काळया-पांढऱ्या केसांची एक वेणी, काखेत साधीशी पर्स अशा अवतरतील एक काकू उभ्या होत्या. मला वाटले त्या सेल्समन असतील. मी त्रासिक चेहेऱ्याने विचारले, “काय आहे?” त्या म्हणाल्या, “नमस्कार, माझे नाव राणी आहे. माझा भाऊ कोमात आहे. मालाडच्या सहजीवन हॉस्पिटलमध्ये ॲडमिट आहे. माझी आर्थिक परिस्थिती चांगली नाही. म्हणून मी घरोघरी मदत मागत फिरत आहे. तुम्ही काही मदत कराल तर फार उपकार होतील.” अशाप्रकारच्या फसवणुकीचीच्या गोष्टी पेपरात वाचल्यामुळे माझा त्या काकूंवर विश्वास बसला नाही. मी ‘सॉरी’ म्हणून दरवाजा बंद केला. काहीवेळाने हळूच खिडकीतून पहिले, तर  त्या काकू शांतपणे निघून गेल्या. मी पण त्या गोष्टीचा फार विचार न करता परत झोपलो.

दोन दिवसांनी ऑफिसच्या कामासाठी मालाडला गेलो होतो. घरी परतताना राणी काकू दिसल्या. घाईघाईने कुठेतरी जात होत्या. मला त्यांच्याबद्दल संशय होताच म्हणून मी त्यांचा पाठलाग करू लागलो. काही वेळ चालल्यावर त्या एका माणसाशी बोलूत उभ्या राहिल्या. बराच वेळ बोलत होत्या. मला घरी जायला उशीर होत होता म्हणून मी जायला निघालो. पण जाता जाता मोबाइलमध्ये त्या दोघांचा फोटो काढून घेतला.

दुसऱ्या दिवशी ऑफिस सुटल्यावर दादरला कॉलेजमधल्या एका मित्राकडे –दर्शनकडे- त्याच्या वाढदिवसाच्या पार्टीसाठी गेलो होतो. त्याच्या घरात त्याच्या बाबांच्या तरुणपणीचा फॅमिली फोटो होता. त्यातला एका बाईचा चेहेरा मला राणी काकूंसारखा वाटला. मी मित्राला जरा बाजूला ओढले आणि त्या बाईंबद्दल विचारले. तेव्हा त्याने मला पुढील गोष्ट सांगितली.

त्या बाईंचे नाव राणीच होते. त्या दर्शनची आत्या होत्या. ती एकूण 3 भावंडे. दर्शनचे बाबा हे राणी काकूंचे धाकटे भाऊ. वीस वर्षांपूर्वी त्या घरातून पळून गेल्या होत्या. कारण त्याचे एका मुलावर प्रेम होते. पण वडिलांचा लग्नाला विरोध होता. शेवटी त्यांनी पळून जाऊन लग्न केलं. वडिलांनी राणी काकूंशी संबंध कायमचे तोडले. या गोष्टीवर त्यांचे आणि राणी काकूंच्या थोरल्या भावाचे भांडण झाले आणि त्यानेपण घर सोडले. दर्शनचे बाबा कायम त्यांच्या आई-वडिलांसोबत राहिले, मात्र मनातून सतत त्यांना आपल्या भावाची आणि बहिणीची आठवण येत होती. वडिलांच्या मृत्यूनंतर त्यांनी भाऊ-बहिणीला शोधण्याचा खूप प्रयत्न केला. पण त्यांना अपयशचं आले. शेवटी त्यांनी तो नाद सोडून दिला.

मी ताबडतोब दर्शनच्या वडिलांना भेटलो आणि त्यांना राणी काकूंचा फोटो दाखवला. त्या दर्शनच्या आत्याच होत्या. मी दर्शनच्या बाबांना त्यांच्या भेटीबद्दल सगळे संगितले. हॉस्पिटलचे नाव आणि पत्ता पण सांगितला. त्यांनी माझे आभार मानले आणि राणी काकूना भेटण्याचे कबूल केले. पार्टी संपली आणि आम्ही सगळेजण परत निघालो मी त्या राणी काकूना मदत न केल्याची आणि त्यांच्या बद्दल वाईट विचार केल्याची माझ्या  मनात खंत होती. पण त्यांना त्यांच्या परिवाराची भेट घडवून दिली याचा आनंदपण होता.

नंतर कामाच्या व्यापात मी ते सारे काही विसरलो. काल दर्शनचा फोन आला. त्याने विचारले, “उद्या सकाळी घरी आहेस का? बाबांना तुला भेटायचे आहे.” मी ‘हो’ म्हणालो. कशासाठी भेटायचे असेल त्यांना? असा प्रश्न मला पडला. कदाचित राणी काकूंबद्दल काही माहिती मिळाली असेल असे मला वाटले.

आज सकाळी दर्शन, दर्शनचे बाबा राणी काकूंना घेऊन घरी आले. मला मनातून अपराधी वाटत होते. सारखा तो प्रसंग आठवत होता. ते बसल्यावर मी प्रथम राणी काकूंच्या पाया पडलो आणि त्यांची माफी मागितली. त्यांनी मला उठवले आणि प्रेमाने माझ्या चेहेऱ्यावरून हात फिरवला. त्यांचे डोळे पाण्याने डबडबले होते. उलट त्यांनीच माझे आभार मानले. त्यांच्या बोलण्यातून समजले त्या ज्या माणसाला भेटत होत्या ते संजीवनी हॉस्पिटल मधले डॉक्टर होते आणि तसेच त्यांची गोष्ट समजली.

राणी काकूंनी घरातून पळून ज्याच्याशी लग्न केलं त्यांचा काही महिन्यांतर एका अपघातात मृत्यू झाला. त्यामुळे राणी काकूंवर दु:खाचा डोंगरच कोसळला. वडिलांनी संबंध

तोडलाच होता. तरीही एकदा त्या घरी परत गेल्या, तेव्हा त्यांच्या वडिलांनी त्यांना घरातून हाकलून दिले. यावरूनच तिच्या थोरल्या भावाचे आणि वडिलांचे भांडण झाले होते. तो थोरला भाऊसुद्धा घरातून बाहेर पडला आणि आपल्या बहिणीसोबत राहू लागला. राणी काकूंनी तिच्या नवऱ्याचे दादरचे घर विकले आणि मालाडला एका चाळीत राहू लागल्या. त्या एका Private Company मध्ये नोकरी करू लागल्या आणि भाऊ एका बँकेत क्लार्क म्हणून काम करत होता. ते आनंदी होते. काही वर्षांनी त्यांचा भाऊ चाळीच्या पायऱ्या उतरत असताना पाय घसरून पडला आणि त्यामुळे त्यांच्या डोक्याला मार बसला. चाळीतल्या माणसांनी ताबडतोब त्यांना सहजीवन हॉस्पिटलमध्ये ॲडमिट केले. तेथे डॉक्टरांनी सांगितले की तो कोमात आहे. हे ऐकून राणी काकूंच्या पायाखालची जमीनच सरकली. त्यांचा जगण्याचा एकमेव आधारही निघून जात होता. त्यामुळे त्यांचे मन अस्थिर झाले. त्यांच्या कामात सतत चुका होऊ लागल्या. परिणामत: त्यांना कंपनीतून काढून टाकले. आता भावाच्या आजारपणाचा खर्च कसा परवडणार? हा प्रश्न त्यांच्या समोर होता. त्यांनी स्वत:चे दागिने विकले. शेजारी, बँक, जिथून जिथून शक्य होईत तिथून मदत घेतली. पण पुरेसे पैसे जमा करू शकत नव्हते. शेवटी त्यांनी घरोघरी फिरून मदत मागायची ठरवले आणि तसे करू लागल्या.

दोन दिवसांपूर्वी दर्शनचे बाबा हॉस्पिटलमध्ये आले आणि त्यांनी राणी काकूंची भेट घेतली. बऱ्याच वर्षानी आपला लाडका भाऊ भेटल्याने त्यांना खूप आनंद झाला. सगळे गैरसमज दूर झाले. दर्शनच्या बाबांनी मोठ्या भावाच्या खर्चाची संपूर्ण जबाबदारी उचलली आणि त्यांच्या बहिणीला घेऊन घरी आले. आज रात्रीच्या गाडीने राणी काकू गावी जाणार होत्या. कारण त्या त्यांचा भावासाठी गावाच्या देवीला नवस बोलल्या होत्या. तो पूर्ण करण्यासाठी जात होत्या. जाण्यापूर्वी त्यांना त्यांची आणि त्यांच्या धाकट्या भावाची भेट घडवणाऱ्याचे आभार मानायचे होते.

आईने त्यांना जेवून जायचं आग्रह केला. जेवून झाल्यावर ते जायला निघाले. जाताना राणी काकूंनी माझे हात हातात घेतले आणि म्हणल्या, “गावी गेल्यावर देवीकडे एकच मागणे मागेन, की जगात जर इतर कोणी राणी असतील, तर त्यांना या मुलासारख्या देवमाणसाच्या घरापर्यंत पोहोचण्याचा रस्ता दाखव..................”

*****समाप्त*****

तर मित्रांनो, तुम्हाला देखील तुमच्या दैनंदिन आयुष्यात असे कितीतरी आदित्य, गायत्री, गिरकर आजोबा, मोहिते काका किंवा राणी काकू भेटत असतीलच. ‘व्यक्ती तितक्या प्रकृती आणि प्रकृती तितक्या विकृती’ या न्यायाने प्रत्येकाचे स्वभाव भिन्न असतात. कित्येकदा आपण त्यांच्या त्यांच्या विचित्र वागण्याकडे दुर्लक्ष करतो. आणि जर कधी आपल्याला त्यांच्या विचित्र वागण्याचा त्रास झाला, तर आपण त्यांना एकतर शिव्या देतो किंवा चारचौघात त्यांना मूर्ख, फसवे, लबाड अशा अपमानास्पद पदव्या बहाल करतो. पण त्यांचे ते वागणे हे त्या वेळचे नसते. पण त्यामागे काहीतरी इतिहास दडलेला असतो. तो इतिहास लगेच समजणे हे अशक्य असते. कारण माणसाच्या मनातले ओळखू शकणारा *pk* हा फक्त अंतराळातच आहे. मी तो इतिहास जाणून व समजून घेण्याचा प्रयत्न केला आणि मला आलेले अनुभव तुमच्यासमोर मांडले. माझ्या या अनुभवांवरून आपणास यापुढे एखादी विचित्र वागणारी व्यक्ती दिसल्यास ‘त्याच्या/तिच्या अशा विचित्र वागण्यामागे काय कारण असेल?’ हा विचार करून त्या व्यक्तीला समजून घ्याल अशी अपेक्षा आहे. अशा वागण्यामुळे तुम्हाला आलेले अनुभव आणि तुमच्या जीवनात झालेले परिवर्तन मला जरूर कळवा.

सुधाकर अशोक तळवडेकर

मोबाईल आणि whatsapp नं. : 8108819800

ई मेल : sudhakartalawadekar8108819800@gmail.com

फेसबुक : https://www.facebook.com/sudhakar.talawadekar

पत्ता : ६,निशिला निवास, ८,जयप्रकाश नगर, रोड नं.२, गोरेगांव (पू),

मुंबई ४०००६३

ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

मोठाच वेगवान काळ आहे हा. तंत्रज्ञानात वेगवान बदल होत आहेत. समाजात वेगाने उलथापालथी होत आहेत. राजकारण अचानक वेगवान घटनांनी भारलेलं आहे. तरूण मंडळींना नवनवीन गॅजेट्सची ओळख होत आहे. कम्म्युनिकेशनची नवनवीन माध्यमं उदयाला येत आहेत आणि अंतही पावत आहेत. ऑर्कुट आलं आणि गेलं. फ़ेसबुक, इन्स्टा, टिकटॉक, ट्विटर, ब्लॉग्ज, मेल्स, व्हॉट्सप, व्हिडिओ कॉल्स असे असंख्य पर्याय उपलब्ध होत असताना संवादाची भाषा म्हणून मराठी टिकेल का आणि कोणत्या स्तरावर टिकेल हा प्रश्न उभा झाला आहे.

आम्ही म्हणतो की मराठी टिकणार तर आहेच पण दिवसेंदिवस मराठीचा वापर वाढत जाईल, तिची ताकद वाढत जाईल आणि मराठीतील पुस्तकांची संख्या आणि त्यांचा दर्जा जागतिक स्तरावर जाईल, अगदी इंग्रजीलाही टक्कर देऊन आपली आंतरिक क्षमता सिद्ध करील.

आणि हे सर्व करणार तुम्ही आम्ही.

मराठीचा वापर करा. मराठी पुस्तके वाचा. मेल्स, मेसेज मराठीत करा. मुलांना मराठी माध्यमात शिकवा. मराठीत नवनवीन साहित्य आणि पुस्तके यायला मदत करा. आणि आपल्या मित्रांना व नातेवाईकांना या यज्ञात भाग घ्यायला प्रवृत्त करा.

जय हिंद.

जय महाराष्ट्र